Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

# भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये क्रिप्टो करन्सी मुळे झालेल्या बदलाचा अभ्यास

**विठ्ठल हरिभाऊ नागरे**
संशोधक विद्यार्थी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर
vitthal07nagre@gmail.com

**प्रा. डॉ. जी.आर खेडकर**
संशोधक मार्गदर्शक

**प्रस्तावना :**

कोणत्याही देशांमध्ये करन्सी हा महत्त्वाचा घटक असतो करन्सी वर आधारित पूर्ण अर्थव्यवस्था ही अवलंबून असते विकासाच्या टप्प्यामध्ये तसा तसा विकास होत गेला तसा करन्सीचा सुद्धा विकास होत गेला आहे २१व्या शतकामध्ये नवीन तंत्रज्ञानाच्या आधारे व्यक्तीचे आयुष्य हे एकदम सुक्कर झाला आहे त्याच्या गरजा वाढल्या आहेत मात्र साधनेही कमी आहेत .सर्वच देशांच्या अर्थव्यवस्थांचा परिपूर्ण विकास झाला तरी, परस्परांवरील अवलंबित्व हे संपत नाही. म्हणून देवाणघेवाण ही संज्ञा अस्तित्त्वात आली आणि या देवाणघेवाणीसाठी एखादी सर्वसामान्य वस्तू असावी ही संकल्पना लोकांच्या लक्षात आली. पूर्वी या देवाणघेवाणीसाठी वस्तुविनीमयाची पध्दत होती, परंतु ही पध्दती कालांतराने अडचणीची वाटु लागली. तेंव्हा नाण्यांचा उगम झाला. इतिहासकारांच्या मते, शेरशहा सुरी यांनी १५४० ते १५४५ च्या दरम्यान रुपया या शब्दाचा वापर केलेला आढळुन येतो. शेरशहा सुरी यांनी रुपयाची प्रथा सुरु केली चांगली अर्थव्यवस्था चांगल्या कारकिर्दीला अधिक सुदृढ करण्यासाठी त्याने रुपया प्रथम नाणे म्हणून चालविण्याचे आदेश दिले. त्यानंतर भारतात १७७० इ. स. पासून कागदी नोटा सुरु झाल्या आणि त्या पहिल्यांदा बँक ऑफ इंडियाने सुरु केल्या हा झाला कागदी पैसा. त्यानंतर अस्तित्त्वात आला तो प्लास्टीक मनी व्यवहारांच्या संख्येनुसार पैसा जवळ बाळगणे शक्य होत नाही. म्हणून क्रेडिट कार्ड, डेबीट कार्डसारखे प्लास्टीक मनी अस्तीत्त्वात आले. पैशाची उत्क्रांती तेथेच न थांबता पुढे जावून आभासी चलन अस्तित्त्वात आले. त्यालाच आज क्रिप्टो करंसी असे संबोधले जाते. चलनी नोटांना पर्याय असणारी एक डिजीटल व व्हर्च्युअल करन्सी हे चलन भारतीय रुपया, अमेरिकन डॉलर, ब्रिटिश पौंडासारखे नसते. सदर शोधनिबंधात क्रिप्टो करन्सी, क्रिप्टो करन्सीच्या निर्मितीची पार्श्वभूमी, क्रिप्टो करन्सीचा इतिहास भारतात क्रिप्टो करन्सी कधी वापरात आली व त्याचे परिणाम याबद्दलची माहिती बघणार आहोत.

**संशोधनाचा उद्देश :**

१. क्रिप्टो करन्सी बद्दलचा इतिहास व माहिती जनसामान्यापर्यंत पोहोचविणे.

२. क्रिप्टो करन्सीचे आधुनिक काळातील महत्व स्पष्ट करणे.

**क्रिप्टो करन्सी इतिहास :**

करन्सी हा इंग्रजी शब्द आहे.त्याला मराठीत चलन असे म्हणतात. प्रत्येक देशाचे चलन हे वेगवेगळे असते. जसे भारतीय रुपया, अमेरिकन डॉलर, जपानी येन ईत्यादी.

तसेच त्या चलनाचे मूल्यदेखील वेगवेगळे असते. या चलनाचा वापर प्रत्येक देश पैसे म्हणून करतात आणि या पैशाच्या सहाय्याने वस्तु व सेवांची खरेदी केली जाते. चलन कागदावर किंवा धातूच्या तुकड्यावर छापले जाते ज्याला आपण स्पर्श करू शकतो. आपण स्वत:जवळ ठेवू शकतो, मात्र क्रिप्टो करन्सी यापेक्षा वेगळी आहे.

क्रिप्टो करन्सी २००९ मध्ये सुरु झाली ज्याचे नाव बीट कॉईन होते. बीटकॉईन हे जपानी अभियंता सातोशी नाकामोटो यांनी तयार केलेले आहे. सुरुवातीला क्रिप्टो करन्सी इतकी लोकप्रिय नव्हती. परंतु आता या चलनाला फार महत्त्व प्राप्त होत आहे. चलनी नोटाला पर्याय असणारी ही एक डिजीटल करन्सी आहे. कोणत्याही देशाचे सरकार व बँक हे चलन छापत नाही. क्रिप्टो करन्सी फक्त ऑनलाईनच उपलब्ध असते. तिला आंतरजाळीय चलन असेही म्हणतात. बीटकॉईन हे क्रिप्टो करन्सीचे उत्तम उदाहरण आहेत. आजच्या काळात हळुहळु क्रिप्टो करन्सीचे दर खुप वाढु लागले आणि पाहता पाहता क्रिप्टो करन्सी खूप महाग झाली आणि आता क्रिप्टो करन्सी कडे लोकांचे लक्ष वेधले गेले. त्यात गुंतवणूक करायली सुरुवात केली आहे. काही महत्त्वाच्या क्रिप्टो करन्सीचे नाव खालीलप्रमाणे सांगता येतील.

१. बिटकॉईन

२. इथेरियम

३. रेडकॉईन

४. सोलाना

५. रिप्पल

६. लाईटकॉईन

**क्रिप्टो करन्सी वापराचे फायदे :**

१. देणी किंवा हस्तांतरण फीस ही जवळपास नसतेच, असलीच तर अगदी नगन्य असते.

२. व्यवहारात सुलभता येते.

३. क्रिप्टो करन्सीमध्ये व्यापार करणे खूप सोपे आहे. क्रिप्टो करंसीमध्ये ट्रेडिंग करून चांगले पैसे कमवता येतात.

४. व्यवहार अपुनरावर्ती असल्यामुळे विक्रेते निर्धास्त होतात.

५. क्रिप्टो करन्सीमध्ये ट्रेडिंग करून चांगले पैसे कमवता येतात.

६. वैध चलनाची किंमत बऱ्यापैकी स्थिर असते परंतु बीट कॉईनची किंमत मागणी आणि पुरवठ्यावरून ठरते. पुरवठ्यापेक्षा मागणी वाढल्यास बीटकॉईनची किंमत वाढत जाते. त्यामुळे बिटकॉईन घेण्यात चलन बाळगणे व गुंतवणूक करणे असे दुहेरी फायदे होतात. अर्थात गुंतवणुक म्हटले की, जोखीम आली.

७. बिटकॉइन व्यवहारामध्ये मध्यस्त नसतो. यामुळे कुठलेही सरकार किंवा मध्यवर्ती बँकेला या व्यवहारांचा थांग पत्ता लागत नाही.

८. क्रिप्टो करंन्सी हे डिजीटल चलन आहे. त्यात फसवणुक होण्याची शक्यता खुपच कमी असते.

**क्रिप्टोकरन्सी वापराचे तोटे :**

१. क्रिप्टो करन्सी हे डिजीटल चलन आहे. त्यामुळे त्यात हॅकींगचा धोका असतो. हे इथरियम च्या बाबतीत घडले आहे.

२. बिटकॉईनसाठी लागणारे तंत्रज्ञान अपुरे आहे. कारण बिटकॉईनसाठी लागणारे तंत्रज्ञान दिवसेंदिवस प्रगत करावे लागणार आहेत.

३. मर्यादित वापर असल्यामुळे सर्व व्यवहार बिटकॉईनने शक्य होत नाही.

४. व्यवहाराची संख्या मर्यादित असल्यामुळे बिटकॉईनच्या कीमतीत जास्त चढउतार संभवतात.

५. एकदा व्यवहार झाला की, क्रिप्टो करन्सी रिझर्व करण्याचा पर्याय राहत नाही.

**क्रिप्टो करंसी आणि भारत :**

भारतात आभासी चलन व्यवहार करणाऱ्या एक्सचेंजची निर्मिती चालु दशकात झाली. रिझर्व बँकेने क्रिप्टो करंसीला मान्यताही दिली नाही किंवा अवैद्य ठरवलेले नाही. २४ डिसेंबर २०१३ रोजी आरबीआय ने अशा चलनांच्या जोखीमेचे जाणीव करून देणारे पत्र प्रकाशित केले. त्याप्रमाणे २०१७ मध्ये देखील हे पत्र

वेळोवेळी प्रकाशित करण्यात आले. वित्त मंत्रालयाने २९ डिसेंबर २०१७ ला एका पत्रकानुसार क्रिप्टो करन्सीमधील गुंतवणुक या फसवणुक करणाऱ्या एप्रिल २०१८ रोजी भारतीय रिझर्व बँकेने भारतातील बँकांना क्रिप्टो करंन्सी एक्सचेंज करून कोणतेही आर्थीक व्यवहार करण्याची परवानगी बंद केली. म्हणजे या क्रिप्टो करंसीला अवैद्य न ठरविता अप्रत्यक्षरित्या या चलनाच्या वापरावर बंदी घातली. कारण हे कुणाच्या तयारीत येईल हे सांगता येत नाही.

**सारांश :**

जग जसजसे विकासाच्या मार्गावर चालले आहे. तसे प्रत्येक बाबतीत बदल हे होत आहे आणि हे बदल स्विकारणे काळाची गरज आहे. पैशांच्या बाबतीत देखील हे घडले आहे. आज सर्व व्यवहार हे ऑनलाईन होतात आणि त्यामुळेच डिजीटल चलनाची निर्मिती हे काही वेगळे नाही. क्रिप्टो करंसी हे एक डिजीटल चलनाचे उदाहरण आहे. आणि याचा स्वीकार करणे काळाची गरज आहे. यामध्ये बऱ्याच जोखीमांचा समावेश असला तरी सुरक्षीत राहून व्यवहार करणे गरजेचे आहे. जर बदलत्या अर्थव्यवस्थेबरोबर प्रत्येक व्यक्तीला वाटचाल करायची असेल तर हे बदल स्वीकारून व्यवहार करणे गरजेचे आहे. प्रत्येक व्यक्तीने या डिजीटल चलनाचा वापर करावा. काही नवीन गोष्टी या जरी नव्याने अस्तित्वात आल्यानंतर स्वीकारायला वेळ लागत असला. तरी कालांतराने त्या स्वीकाराव्याच लागतात. क्रिप्टो करन्सीच्या बाबतीत जरी जोखीम मोठ्या प्रमाणात असली तरी तिचा वापर करणे ही काळाची गरज आहे.

**संदर्भसूची :**

१. www.wikipedia.orj

२. www.loksatta.com

३. अर्थसंवाद

४. किरण देसले, भारतीय अर्थव्यवस्था (दिपस्तंभ प्रकाशन)

५. रंजन कोळंबे, भारतीय अर्थव्यवस्था (भगीरथ प्रकाशन)

६. प्रतियोगिता दर्पण

७ भारताचे आर्थिक सर्वेक्षण (२०११ ते २०२१)

८. सर्वोत्तम कुलकर्णी यांचा लेख अर्थसंकल्प सामान्य साठी की गुंतवणूकदारांसाठी

९. माधव बिरादार( महाराष्ट्राची अर्थव्यवस्था)